# राज्य आरोग्य सोसायटी,महाराष्ट्र, मुंबई

## राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत

## आरोग्य विभागातील अतिदुर्गम व आदिवासी भागातील कार्यरत वैद्यकीय अधिकाऱ्यांचे कौशल्य अद्यावत करण्यासाठी फक्त वैद्यकिय क्षेत्रात काम करणाऱ्या डॉक्टरांच्या/विशेष तज्ञांच्या संघटना/फोरम/वैद्यकिय संस्था यांच्यामार्फत CME कार्यशाळा आयोजनासाठी संस्थांची निवड

महाराष्ट्रातील अतिदुर्गम, आदिवासी व नक्षलग्रस्त भागातील प्राथमिक आरोग्य केंद्रात कार्यरत असणारे वैद्यकीय अधिकारी, हे अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत जनतेला वैद्यकीय सेवा देत असतात. अशा वैद्यकीय अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देण्यासाठी, वैद्यकिय ज्ञान व कौशल्ये वाढविण्यासाठी, त्यांचे सामाजिक व सांस्कृतिक मनोबल उंचावण्यासाठी त्यांच्या कुटुंबियांसह तीन दिवसांसाठी निवासी Continuing Medical Education (CME) कार्यशाळेबरोबरच सांस्कृतिक तसेच, त्यांच्यातील कलागुण जोपासण्यासाठी विविध कार्यक्रमांचे आयोजनासाठी, फक्त वैद्यकिय क्षेत्रात काम करणाऱ्या वैद्यकीय विशेषज्ञांच्या संघटना/फोरम/ संस्था यांचेकडून खालील अटी पुर्ण करण्याऱ्या सक्षम व अनुभवी संस्थांकडून प्रस्ताव मागविण्यात येत आहेत.

- ❖ प्रशिक्षण कार्यक्रम निवासी असून त्यासाठी विशेषज्ञ लेक्चर फीज, हॉटेल निवास भाडे, भोजन खर्च, सेलिब्रिटी खर्च, आऊट डोअर व्हिजिट खर्च, ट्रान्सपोर्ट खर्च, प्रिंटींग मटेरियल खर्च, पोस्टेज, व इतर खर्च प्रतिसत्र देण्यात येईल.

१) डॉक्टरांच्या/विशेषतज्ञांच्या संघटना/फोरम/वैद्यकिय संस्था यांची नोंदणी प्रमाणपत्र.
२) संस्थेकडे मार्गदर्शक विशेषतज्ञांचे पॅनल उपलब्ध असल्याचे पुरावे.
३) महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलच्या मान्यतेने किमान ५ वेळा तत्सम कार्यशाळा/प्रशिक्षण आयोजनाचे पुरावे व त्यापैकी किमान १ कार्यशाळा सांस्कृतिक कार्यक्रमासह असलेला पुरावा.
४) वैद्यकीय अधिकाऱ्यांना क्रेडिट पॉईंट मिळविण्यासाठी MMC कडे नोंदणी व मंजूरीबाबत प्रमाणपत्र.
५) प्रत्यके CME मधील कार्यशाळेसाठी सार्वजनिक आरोग्याचे महत्व या विषयातील वरिष्ठ तज्ञ संस्थेने उपलब्ध करुन द्यावे लागतील.
६) मार्गदर्शक विशेषतज्ञांबाबत अटी व शर्ती मान्य असल्याबाबत प्रतिज्ञापत्रक.
७) मागील तीन वर्षाचे ऑडिट अहवाल.
८) CME प्रशिक्षणाचे आयोजन करण्यासाठीचे अंदाजपत्रक.

डॉक्टरांच्या/विशेष तज्ञांच्या संघटना/फोरम/वैद्यकिय संस्था इत्यादी संघटना किंवा संस्थांचे प्रस्ताव दि. ०४/०२/२०१७ च्या आत कामकाजाच्या वेळेत नोंदणकृत टपालाने अथवा स्वतः उपस्थित राहून आयुक्त (आ.से.) व अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई, आरोग्य भवन, ३ रा मजला, सेंट जॉर्ज रुग्णालय आवार, पी. डीमेलो रोड, मुंबई ४०००१ या कार्यालयात सादर करावेत.

सहसंचालक (तांत्रिक)
राष्ट्रीय आरोग्य अभियान,
राज्य आरोग्य सोसायटी, मुंबई.